राज्यातील मुदत समाप्त झालेल्या ५ नगरपंचायतींच्या सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आरक्षण व सोडतीचा सुधारित कार्यक्रम-२०२२.

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/नप-२०२१/प्र.क्र.६/का-६
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- १० जून, २०२२.

प्रति,

जिल्हाधिकारी,
पुणे, नांदेड, अमरावती, गोंदिया व नागपूर.

विषय:- राज्यातील मुदत समाप्त झालेल्या ५ नगरपंचायतींच्या सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आरक्षण सोडतीचा सुधारित कार्यक्रम-२०२२.

संदर्भ: १) आयोगाचे क्रमांक रानिआ/नप-२०२१/प्र.क्र.१०/का-६, दि.२७/१२/२०२१ रोजीचे आदेश.
२. आयोगाचे क्र.नानिआ/नप-२०२०/प्र.क्र.०६/का-६, दि.१२/१०/२०२० रोजीचा प्रभाग रचना कार्यक्रम.
३. आयोगाचे क्र.नानिआ/नप-२०२०/प्र.क्र.०८/का-६, दि.२९/१०/२०२० रोजीचा प्रभाग रचना कार्यक्रम.
४. राज्य निवडणूक आयोगाचा समक्रमांचा दि.०९/११/२०२१ रोजीचा सुधारित आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम.
५. मा. सर्वोच्च न्यायालयाने SLP क्र.१९७५६/२०२१ मधील मा. सर्वोच्च न्यायालयाचे दि.०४/०५/२०२२ रोजीचे आदेश.

महोदय/महोदया,

नांदेड जिल्ह्यातील **हिमायतनगर** नगरपंचायतीची ना.मा.प्र. व ना.मा.प्र. (महिला) यांची सोडत राज्य निवडणूक आयोगाने निर्देशित केलेल्या विहीत प्रक्रियेनुसार झालेली नसल्यामुळे हिमायतनगर नगरपंचायतीच्या ना.मा.प्र. सदस्य पदांचा आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम सुधारीत देण्याबाबत जिल्हाधिकारी नांदेड यांनी दि.१९/११/२०२१ च्या पत्रान्वये आयोगास विनंती केली होती. त्यास अनुसरून आयोगाकडून देण्यात आलेला दि.१२/११/२०२१ चा फेर सोडतीचा सुधारीत कार्यक्रम व दि.१७/११/२०२१ चा मतदार यादीचा कार्यक्रम दि.२२/११/२०२१ च्या पत्रान्वये रद्द करण्यात आला होता.

२. नागपूर जिल्ह्यातील **भिवापूर** नगरपंचायतीची आरक्षणाची सोडत काढतेवेळी ना.मा.प्र. व ना.मा.प्र. (महिला) आरक्षणाची सोडत नियमानुसार काढण्यात आलेली असून सर्वसाधारण महिला प्रवर्गाचे आरक्षण निश्चित करतांना चूक झाल्याने सदर कार्यक्रम व दि.१७/११/२०२१ चा मतदारयादीचा कार्यक्रम रद्द करण्यात आलेला आहे.

३. गोंदिया जिल्ह्यातील **गोरेगांव** नगरपंचायतीमधील सर्वसाधारण (महिला) प्रवर्गाचे आरक्षण निश्चित करताना चूक झाल्याने, सर्वसाधारण (महिला) प्रवर्गाचे आरक्षण निश्चित करणे गरजेचे असल्याचे जिल्हाधिकारी, गोंदिया यांनी आयोगास कळविल्यामुळे दि. १२/११/२०२१ चा फेरसोडतीचा सुधारीत कार्यक्रम व दि.१७/११/२०२१ चा मतदार यादीचा कार्यक्रम दि.२२/११/२०२१ च्या पत्रान्वये आयोगाकडून रद्द करण्यात आलेला आहे.

४. अमरावती जिल्ह्यातील **धारणी** नगरपंचायतीमधील ना.मा.प्र. व सर्वसाधारण (महिला) आरक्षणाची सोडत काढताना आयोगाचे निर्देशाचे पालन न झाल्यामुळे धारणी नगरपंचायतीसाठी ना.मा.प्र. व सर्वसाधारण (महिला) यांच्यासाठी पुन्हा नव्याने आरक्षण व सोडतीची प्रक्रिया राबविणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दि.१८/११/२०२१ च्या पत्रान्वये आयोगास कळविल्यामुळे दि. १२/११/२०२१ चा फेरसोडतीचा सुधारीत कार्यक्रम व दि.१७/११/२०२१ चा मतदार यादीचा कार्यक्रम रद्द करण्यात आलेला आहे.

५. पुणे जिल्ह्यातील नवनिर्मित **माळेगाव-बुद्रुक** नगरपंचायतीची मतदार यादी राज्य निवडणूक आयोगाच्या दि. १७/११/२०२१ च्या कार्यक्रमानुसार दि. २९/११/२०२१ रोजी अंतिम प्रभाग निहाय अधिप्रमाणीत करून प्रसिध्द करण्यात आली आहे. या नगरपंचायतीच्या स्थापनेबाबत मा. उच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेमध्ये मा. न्यायालयाने पुढील सुनावणीपर्यंत निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात येऊ नये असे आदेशीत केल्यामुळे माळेगाव नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला नाही. तसेच मा. उच्च न्यायालयात दिनांक १६ मार्च, २०२२ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये मा. न्यायालयाने सदर याचिका खारीज केली आहे.

६.   मा. सर्वोच्च न्यायालयाने SLP क्र.१९७५६/२०२१ मध्ये दि.०४/०५/२०२२ रोजी दिलेल्या आदेशात असेही नमूद केले आहे की, जो पर्यंत राज्य शासन त्रिस्तरीय चाचणी पूर्ण करीत नाही, तोपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये नागरिकांच्या मागावर्ग प्रवर्गाकरिता जागा राखून ठेवता येणार नाही. मा सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त आदेशातील निर्णया नुसार आरक्षण ठरविण्याचा कार्यक्रम देणे आवश्यक आहे. अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती व त्यामधील महिलांचे आरक्षण यापूर्वीच राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या दि.१२/१०/२०२० व दि.२९/१०/२०२० रोजीच्या प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीच्या कार्यक्रमानुसार निश्चित करण्यात आलेले असल्यामुळे वर नमूद एकूण ५ नगरपंचायतींमधील  अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती व त्यामधील महिला यांच्यासाठी पुन्हा आरक्षण निश्चित करण्याची आवश्यकता नाही. तथापि, उर्वरित सर्व जांगामधून सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांचे आरक्षण निश्चित करण्यात यावे. तसेच उपरोक्त नमूद केलेल्या नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आरक्षित जागा निश्चित करण्याकरिता खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत:-

## आदेश

**आरक्षण व सोडत :-**

i) राज्यातील ५ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी **परिशिष्ट-१** नुसार आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम  देण्यात येत आहे. त्यानुसार सर्वसाधारण प्रवर्गातील महिला यांच्याकरिता आरक्षित जागा निश्चित करण्याकरिता सोडतीचा कार्यक्रम राबविण्यात यावा.

ii) सोडतीसाठी, फिरणारा पारदर्शक ड्रम/काचेचा बॉक्स वापरावा व त्यामध्ये टाकावयाच्या चिठ्ठयांचा आकार कमीत कमी A४ या आकाराचा असावा. चिठ्ठीवरील अनुक्रमांक बाहेरुन दिसणार नाहीत याची दक्षता घ्यावी. त्यावर लावावयाचे रबर बँड एकाच रंगाचे असावेत. शक्य असल्यास सोडतीचे थेट प्रक्षेपण स्थानिक केबल टि.व्ही. वर करावे.

iii) प्रभागरचना आणि आरक्षण राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक रानिआ/नप-२०२१/प्र.क्र.१०/का.६, दिनांक २७/१२/२०२१ नुसार करावी. या आदेशानुसार विहित केलेल्या परिशिष्ट १ ते १४ नुसारची माहिती तयार करुन ती सर्व जनतेच्या निदर्शनास आणण्याकरिता आवश्यक ती उपाय योजना करावी.

iv) सदस्य पदाच्या आरक्षणाच्या सोडतीकरिता नोटीस, मतदारांच्या माहितीसाठी हरकती व सूचना, अंतिम प्रभाग रचना इत्यादी याकरिता मोठ्या प्रमाणात प्रसिध्दी देण्यात यावी. उदा.

(a) स्थानिक वृत्तपत्रे, केबल टी.व्हि. वर

(b) नगरपंचायतींच्या प्रभाग समितीचे व इतर कार्यालयातील सूचना फलक,

(c) जिल्हाधिकारी व तहसील कार्यालयाचे सूचना फलक

(d) स्थानिक पातळीवर इतर माध्यमे.

(e) जिल्हाधिकारी व नगरपंचायतींच्या संकेत स्थळावर इत्यादी

(v) प्रारूप प्रभाग रचना व अंतिम प्रभाग रचना जिल्हाधिकारी व नगरपंचायतींच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करणे बंधनकारक राहील.

(vi) सोडतीच्यावेळी अंतिम प्रभाग रचनेचा नकाशा व त्याच्या चतुःसिमा,सोडतीसाठी येणाऱ्या नागरिकांना सहज दिसेल अशा ठिकाणी लावून ठेवावा.

(vii) सोडत, जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या उपजिल्हाधिकारी दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली होईल. प्रभाग रचना, आरक्षण व सोडत इत्यादी पासून अंतिम अधिसूचना प्रसिध्द करण्यापर्यंतच्या कार्यवाहीवर नियंत्रण ठेवण्याकरीता **उपजिल्हाधिकारी** दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करावी. सोडतीची रंगीत तालीम **फक्त संबंधीत अधिकारी** व **कर्मचारी** यांचे उपस्थितीत घ्यावी.

७. उपरोक्त नमूद ५ नगरपंचायतींबाबत प्रभाग रचना करण्यास बाधा येणारी कोणतीही बाब जसे न्यायालयीन प्रकरण इ.बाबतची माहिती त्वरीत आयोगास अवगत करावी.

८. **प्रसिध्दीबाबत :-** निवडणूक प्रक्रियेच्या विविध टप्प्यांवरील माहिती नगरपंचायतींनी वेळोवेळी त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे बंधनकारक राहील. तसेच प्रत्येक टप्प्यावरील अहवाल राज्य निवडणूक आयोगास तात्काळ सादर करावा.

९. राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयातील दूरध्वनी क्रमांक तसेच ई-मेल पुढीलप्रमाणे आहे:-

दूनध्वनी क्रमांक :- २२०४५०७५ / २२०२७७३७ / २२८४६७२०

ई-मेल :- sec.mh@gov.in

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या मान्यतेने,

आपला,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सहपत्र- परिशिष्ट- १

**प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी:-**

१. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
३. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर.
४. संबंधित नगरपंचायतीचे प्रशासक व मुख्याधिकारी.
५. संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई.
६. राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी व कार्यासने.
७. राज्य निवडणूक आयोगाचे मुंबई उच्च न्यायालयाच्या तिन्ही खंडपीठांमध्ये नेमलेले वकील.
८. निवड नस्ती/कार्या-६.

# आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम-२०२२

## परिशिष्ट -१ (नगरपरिषद/नगरपंचायतींसाठी)

**राज्यातील मुदत समाप्त झालेल्या ५ नगरपंचायतींच्या सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आरक्षण व सोडतीचा सुधारित कार्यक्रम -२०२२.**

**(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/नप-२०२१/प्र.क्र.६/का-०६, दि.१०/०६/२०२२ सोबतचे परिशिष्ट.)**

| अ. क्र. | टप्पा | कार्यवाही कोणी करावयाची आहे. | टप्पा सुरु करण्याचा /संपविण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १. | सदस्य पदांच्या आरक्षणाच्या सोडतीकरिता नोटीस प्रसिध्द करणे **(जिल्हाधिकारी व नगरपरिषद/नगरपंचायतींच्या वेबसाईटसह)** | जिल्हाधिकारी | ११/०६/२०२२ (शनिवार) |
| २. | नगर परिषदांच्या सदस्य पदांच्या आरक्षणाची सोडत काढणे. (सर्वसाधारण प्रवर्गातील महिला) | मुख्याधिकारी | १३/०६/२०२२ (सोमवार) |
| ३. | आरक्षणाची अधिसूचना (कलम १० नुसार) रहिवाश्यांच्या माहितीसाठी व हरकती तसेच सूचना मागविणेकरिता वृत्तपत्रात व स्थानिकपातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगरपंचायतींच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे. | जिल्हाधिकारी | १५/०६/२०२२ (बुधवार) |
| ४. | आरक्षण व सोडतीच्या अनुषंगाने हरकती व सूचना मागविण्याचा कालावधी | जिल्हाधिकारी | १५/०६/२०२२ (बुधवार) ते २१/०६/२०२२ (मंगळवार) पर्यंत |
| ५. | आरक्षण व सोडतीचा अहवाल संबंधित विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगर परिषद प्रशासन यांच्याकडे पाठविणे. | जिल्हाधिकारी | २४/०६/२०२२ (शुक्रवार) पर्यंत |
| ६. | नगरपंचायतींच्या सदस्य पदांच्या आरक्षणास मान्यता देणे. | संबंधित विभागीय आयुक्त | २९/०६/२०२२ (बुधवार) पर्यंत |
| ७. | सदस्य पदांच्या आरक्षणाची अधिसूचना कलम १० नुसार रहिवाश्यांच्या माहितीसाठी वृत्तपत्रात व स्थानिकपातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगरपंचायतींच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे. | जिल्हाधिकारी | ०१/०७/२०२२ (शुक्रवार) पर्यंत |

**टीपः- प्रत्येक नगरपंचायतींच्या आरक्षण व सोडत इत्यादी ते अंतिम अधिसूचना प्रसिध्द करण्यापर्यंतच्या कामावर नियंत्रण ठेवण्याकरीता जिल्हाधिकारी यांनी उप जिल्हाधिकारीपेक्षा कमी नसलेल्या दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करावी.**

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र